OFFICE OF THE
CHIEF CONSERVATOR OF FORESTS,
CHANDRAPUR CIRCLE, CHANDRAPUR,
CIVIL LINE, NAGPUR ROAD,
CHANDRAPUR – 442401
E-mail :ccfchandrapur@gmial.com

मुख्य वनसंरक्षक
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, नागपूर रोड, चंद्रपूर -442401
Phone (07172/256279) Fax 07172/252232)

विषय:- वनजमीन - चंद्रपूर
800 KV HVDC रायगड ते पुगालूर ट्रान्समिशन लाईन प्रकल्पाकरीता वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव

क्रमांक कक्ष - 3(1)/जमीन/प्र.क्र. 402/ 5421
चंद्रपूर दिनांक :- 29/1/2018

संदर्भ :- 1. उपवनसंरक्षक, ब्रम्हपूरी वनविभाग, ब्रम्हपूरी यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-6/जमीन/1461 दिनांक 29/11/2017
2. उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-सर्व्हे/जमीन/1658 दिनांक 16/12/2017
3.. विभागिय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-5/सर्व्हे/जमीन/2298 दिनांक 05/01/2018

----

उपवनसंरक्षक, मध्य चांदा/ब्रम्हपूरी व विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत 800 KV HVDC रायगड ते पुगालूर ट्रान्समिशन लाईन प्रकल्पाकरीता तीन्ही विभागाचे एकूण 103.8991 हे. वनजमीन वळतीकरणाकरीता प्रस्तावित असून त्यानुषंगाने प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावाची पडताळणी केली असता प्रस्तावात खालील प्रमाणे उणीवा आढळून आलेल्या आहेत.

1. प्रस्तावासोबत Importants points & documents. बाबतची माहितीचे प्रपत्र जोडण्यात आलेले नाही.
2. प्रस्तावाचे Part II उपवनसंरक्षक यांनी स्वाक्षरी केलेली नाही.
3. पर्यायी वनीकरण योजना 10 वर्षाचे नियोजना करीता प्रस्तावित करण्यात यावी. व योजनेत Chain Link Fencing ची रक्कम समाविष्ठ केलेली नाही.

4. प्रस्तावाचे Part I मध्ये एकूण 429.8021 हे. क्षेत्र प्रस्तावित असल्याचे नमुद केले आहे. परंतु ऑनलाईन मध्ये 432.6791 हे. नमुद आहे. क्षेत्राची शहनिशा करुन प्रस्तावाचे मुळ प्रतीत व ऑनलाईन मध्ये दुरुस्ती करण्यायत यावी. त्यासंबंधिचे नकाशात सुध्दा दुरुस्ती करावी.
5. Details of Forest Land मध्ये चंद्रपूर वनविभागाचे 49.944 हे. दर्शविलेले आहे. परंतु प्रत्यक्षात 52.8210 हे. वळतीकरण होत असल्याचे दिसुन येते. प्रत्यक्ष क्षेत्राची पडताळणी करुन प्रस्तावाचे मुळ प्रत व ऑनलाईन मध्ये सुधारणा करण्यात यावी. तसेच त्यासंबंधिचे नकाशात सुध्दा दुरुस्ती करावी.
6. केंद्र शासनाचे दिनांक 1 ऑगस्ट 2017 चे पत्रान्वये सुधारीत Cost Benefit Analysis गणना करुन सुधारीत Cost Benefit Analysis जोडण्यात यावा.
7. बोडदा येथिल सर्व्हे नंबर 30 अथवा 30/1 तसेच बल्लारपूर माल येथिल सर्व्हे नंबर 139, 142, 145 क्षेत्राची पडताळणी व शहनिशा करुन दुरुस्ती करावी.
8. पर्यायी वनीकरणाकरीता निवड केलेल्या क्षेत्राचे उपयोगितता प्रमाणपत्रात (Suitability Certificate) सदर क्षेत्रावर कोणताही बोजा व अतिक्रमण नसल्याबाबत नमुद केले नसल्याने सुधारीत उपयोगिता प्रमाणपत्र (Suitability Certificate) जोडण्यात यावा.
9. Medicinal Plantation ची योजना जोडण्यात यावी.
10. वृक्षतोडीचे अंदाजपत्रक सादर करण्यात यावे.
11. केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार FRA Certificate विहीत प्रपत्रात प्रमाणपत्र मुळ प्रस्तावासोबत व ऑनलाईन अपलोड करण्यात यावा. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक एफएलडी-2015/प्र.क्र.192/फ-10 दिनांक 23/02/2016 चे पत्रात सदर प्रमाणपत्राची पुर्तता झाल्याशिवाय यापुढे असे प्रस्ताव राज्य/केंद्र शासनास सादर करु नये अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने परिपूर्ण कार्यवाही झाल्याशिवाय प्रस्ताव सादर करु नये.
12. प्रस्तावित क्षेत्र अनुसूचित क्षेत्रात/क्षेत्राबाहेर असल्याबाबतचे प्रकल्प यंत्रणा व उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
13. प्रकल्प यंत्रणेनी Environmental Clearance बाबतचे प्रमाणपत्र जोडावे.

14. एकरेषीय प्रकल्पात पर्यायी जागेचा (Alternative Examine) शोध घेऊनही न मिळाल्याबाबत तसेच त्यांचे संरेखा नुसार अंतर्भुत क्षेत्राचे ताळमेळ पत्रक प्रकल्प यंत्रणेनी जोडावे.

15. जिल्हयातील Identified Forest ची यादी जोडण्यात यावी.

16. प्रस्तावित Tramsmission Line ची संरेखा प्राधिकृत यंत्रणेनी मंजूर केल्याबाबतचे व ते बरोबर असल्याबाबतचे उपवनसंरक्षक/प्रकल्प यंत्रणा यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

17. प्रस्तावित क्षेत्रात सभोवतालचे क्षेत्रात वन्यजीव व पक्षी यांचे अधिवास असल्यास त्यांचे अधिवास सुरक्षिततेकरीता व संरक्षणाकरीता प्रकल्प यंत्रणेनी सखोल अभ्यास करुन आराखडा तयार करावा. व तो प्रस्तावा सोबत जोडण्यात यावा.

18. नकाशे DGPS प्रणालीतून तयार करण्यात येऊन नकाशाच्या Soft Copies Shape file मध्ये तयार करुन CD सादर करावी.

19. वनविगाच्या दर्शक नकाशात Alignment नुसार Tower No. व Location दर्शविण्यात यावे.

20. Online प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

21. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांची C.A.Map वर स्वाक्षरी नाही.

वरिल प्रमाणे त्रुटयांची पुर्ततेकरीता प्रस्ताव मुळ प्रतीसह परत करण्यात येत असून त्रुटयांची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव नकाशाचे सॉफट कॉपीचे सिडीसह या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र :- वरिल प्रमाणे**

मुख्य वनसंरक्षक
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर

**प्रति,**

**उपवनसंरक्षक,**
**मध्य चांदा/ब्रम्हपूरी**
**विभागीय वन अधिकारी,**
**चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**

**प्रतिलिपी** :- उप प्रबंधक, मे. पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, ब्रम्हपूरी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.